# University of Mumbai

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

**सांख्यिकी कक्ष**
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

## No. UDSTAT/ICD/2020-21/ 24 of 2020

**परिपत्रक :-**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्थी संख्या बाबतची (Student on Roll-www.eoffice.mu.ac.in/statistical) माहिती नोंदविणेबाबत. (दिनांक ३० सप्टेंबर २०२० नुसार)**

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांचे उपरोल्लेखित विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाकरीता विचारण्यात आलेल्या विद्यार्थी संख्या बाबतची ऑनलाईन माहिती ही अत्यंत महत्वाची असल्याकारणाने विद्यापीठाच्या **www.eoffice.mu.ac.in/statistical** या संकेतस्थळावर (Web Portal) उपलब्ध असून ती तात्काळ दिलेल्या विवरण पत्रानुसार (Formats) भरण्यात यावी.

सदर विद्यार्थी संख्येबाबतची माहिती विद्यापीठ आयोग, भारतीय विश्वविद्यालय संघ, केंद्र शासन, उच्चशिक्षण व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई संचालनालय, उच्चशिक्षण, पुणे, सह-संचालनालय, उच्चशिक्षण, मुंबई विभाग, इत्यादी महत्वाच्या शासकिय नियंत्रक संस्था/विभाग यांना ठराविक कालावधीमध्ये उपलब्ध करून देणे बंधनकारक असते. त्याच प्रमाणे ती माहितीच्या अधिकारांतर्गत विचारण्यात येत असल्यामुळे विनाविलंब अपीलकर्त्यास पाठविणे सुध्दा अनिवार्य असते. म्हणून सदरची ऑनलाईन माहिती आपल्या मार्फत वेळेत सादर होणे अत्यावश्यक आहे, याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी. त्याच बरोबर सदरची माहिती भरताना काही महत्वाच्या सूचना आपल्या माहितीस्तव खालीलप्रमाणे सादर :-

१. **शैक्षणिक वर्षे २०१९-२० या वर्षापासून दिव्यांग (Handicapped) विद्यार्थी व शिक्षक यांना त्यांच्या प्रवर्गामध्ये (Caste) नोंदणी करणे व त्याच प्रमाणे त्यांना दिव्यांग वर्गात सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थी व शिक्षक यांना फक्त दिव्यांग वर्गात नमुद केल्यास त्यांची एकुण संख्या बेरजेमध्ये समाविष्ट किंवा मोजली जाणार नाही.**

२. **Staff Statistics भरताना अनुदानित (Aided), विना अनुदानित (Unaided) व स्वयंवित्त (Self Finance) शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती वेगवेगळी भरण्यात यावी.**

उपरोक्त सर्व सारांश लक्षात घेता, आपणांस विदित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षा करीता अत्यावश्यक असलेली विद्यार्थी संख्येबाबतची ऑनलाईन माहिती ही दिलेल्या सर्व विवरण पत्रानुसार (Including Temporary Teaching/Non-Teaching staff) (Formats) अचूकतेने व विनाविलंब भरण्याविषयीची सुचना आपल्या महाविद्यालय/संस्थेमधील नोडल अधिकारी व संबंधित कर्मचारी वर्ग यांना वेळोवेळी देण्यात यावी.

त्याचप्रमाणे सदरची संबंधित ऑनलाईन माहिती भरताना काही समस्या/अडचणी उद्भवल्यास नोडल अधिकारी/अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्र. २०२, फोर्ट, मुंबई- ४०००३२ येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रत्यक्ष भेट घेवून संबंधित विषयी माहिती व मार्गदर्शन करून घेणे अथवा ०२२-६८३२००५२६८३२ आणि २२६१८९८७ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# 𝔘𝔫𝔦𝔳𝔢𝔯𝔰𝔦𝔱𝔶 𝔬𝔣 𝔐𝔲𝔪𝔟𝔞𝔦



**टिप्पणी :- १. AISHE, MIS व Students on Roll ऑनलाईन माहिती ज्या संबंधित व्यक्तीने भरलेली असल्यास त्यांनी त्या माहिती विषयी पडताळणी करून घेणे व त्यानंरचे हमीपत्र/प्रमाणपत्र दिलेल्या तारखेस किंवा शक्य असल्यास त्या अगोदर भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून घेणे अनिवार्य आहे.**

**२. सर्व स्थरातील AISHE, MIS व Students on Roll ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर संख्या बाबतच्या माहिती मध्ये कोणतीही तफावत नसावी व ती अचूक असावी, याची आपण नोंद घ्यावी.**

**३. ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षे २०१९-२० व २०२०-२१ करीता AISHE, MIS व Students on Roll वेबपोर्टलवर नोंदणी (Registration ) करून घेतलेली नसल्यास सांख्यिकी कक्षाशी त्वरीत संपर्क साधणे.**

**नोडल अधिकारी**
**(AISHE/MIS Cell)**

**मुंबई : ४०००३२**
**दिनांक : १३ ऑक्टोबर २०२०**

**प्रतः-**

मुंबई विद्यापीठतील सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांच्या पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी व माहितीसाठी अग्रेषित.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता रवानाः-**

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१,यांच्या माहितीस्तव सादर.
२. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
३. प्र. संचालक, ठाणे उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, ठाणे-४०० ६०८.
४. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
५. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये,मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
७. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
८. उपकुलसचिव, पात्रता/नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
९. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी-४१५६३९.
१०. सहायक कुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२
११. सहायक कुलसचिव, कल्याण उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, कल्याण.
१२. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
१३. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.

**उपरोल्लेखित विभागीय अधिकारी यांना असे कळविण्यात येते की, AISHE, MIS व Students on Roll बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/संस्था यांच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी/पात्रता अर्ज (Enrollment/Eligibility Form), महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/ शिक्षकमान्यता (Approval) परिक्षा अर्ज (Exam.Form) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये. असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात यावी, याची आपण प्रमुख या नात्याने गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**नोडल अधिकारी**
**(AISHE/MIS Cell)**